# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १६६ वा ❑ रविवार दि.१७ ऑगस्ट २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## धर्मांतरासाठी होणारा छळ चिंताजनक

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

धर्मांतराचे प्रकार वाढत आहेत.धर्मांतरासाठी छळ आणि मारहाण होत व हिंसा होत आहे.धर्मांतर ही एक गुंतागुंतीची आणि बहुआयामी समस्या आहे, ज्याची अनेक कारणे आणि परिणाम असू शकतात. हा एक असा मुद्दा आहे ज्याचा काळजीपूर्वक आणि संवेदनशीलतेने विचार करणे आवश्यक आहे.

२३ जून रोजी उत्तर प्रदेशातील एका बाबा चांगूरने हजारो लोकांचे धर्मांतर केल्याची माहिती मिळाली. २४ जून रोजी उत्तरोला पोलीस स्टेशन परिसरातील माधपूर गावात बाबाचा मोठा वाडा पाहिल्यानंतर या मोठ्या नेटवर्कचा पर्दाफाश झाला. हे नेटवर्क संपूर्ण भारतात पसरलेले आहे आणि त्याने ५००० हजारो लोकांचे धर्मांतर केले आहे. चांगूर टोळीतील आमिर आणि त्याची बहीण नेहा यांना १२ आणि १३ जुलै रोजी हरियाणामध्ये अटक करण्यात आली होती. पीडितांना परदेशातूनही धमक्या येत आहेत. रामपूर मथुरा येथील एका किशोरीवर बलात्कार आणि धर्मांतराचा प्रयत्न चांगूर टोळीशी संबंधित असण्याची शक्यता आहे. छांगुरचे जाळे महाराष्ट्रात पसरलेले आहे आणि आरोपी त्या किशोरीला मुंबईला घेऊन जाऊ इच्छित होते. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये त्या किशोरीने स्वतः सांगितले आहे.

छांगुरने देशातील ५७९ जिल्हे ओळखले होते जिथे हिंदू बहुसंख्य आहेत. त्याने या जिल्ह्यांमध्ये हिंदू मुलींना इस्लाम धर्मात रूपांतरित करण्याची मोहीम आखली होती. यासाठी छांगुरने तीन हजारांहून अधिक तरुणांना त्याचे अनुयायी म्हणून उभे केले होते. त्याच वेळी, छांगुरने मुलींना प्रेमाच्या जाळ्यात अडकवण्यासाठी १,००० मुस्लिम तरुणांची फौज तयार केली होती.

केरळ धर्मांतरासाठी छळ केल्याचा प्रकार समोर आला आहे. केरळ मधील एरनाकुलम जिल्ह्यातील एका २३ वर्षीय विद्यार्थिनीने (सोना )धर्मांतराच्या दबावामुळे आणि सततच्या क्षणात कंटाळून आपल्या आयुष्याची अखेर केली. तरुणीने सुसाईड नोटमध्ये तिचा प्रियकर रमीज आणि त्याच्या कुटुंबीयांविरुद्ध जीव देण्यास प्रवृत्त करणे आणि मारहाण केल्याचा उल्लेख केला आहे.या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे प्रियकर रमिजने धर्मांतर करण्यासाठी तिचा छळ केल्याचा आरोप आहे. रमिजने इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी तिच्यावर दबाव आणण्यास सुरुवात केली ह्या दबावात रमीजचे कुटुंब ही त्याच्यासोबत होते असा आरोप तिने केला आहे नकार दिल्यावर सोनाच्या शारीरिक आणि मानसिक छळ करण्यात आला

धर्मांतर, किंवा एका धर्मातून दुसऱ्या धर्मात बदल, ही एक गुंतागुंतीची आणि बहुआयामी प्रक्रिया आहे ज्याची विविध कारणे असू शकतात.धर्मांतर अनेकदा धार्मिक किंवा आध्यात्मिक कारणांसाठी, परंतु कधीकधी सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय कारणांसाठी देखील असू शकते. धर्मांतराचे वेगवेगळे प्रकार आहे. एखादी व्यक्ती स्वतःच्या इच्छेने नवीन धर्म स्वीकारते.एका समुदायाचे किंवा गटाचे एकाच वेळी धर्मांतर होते. याला सामूहिक धर्मांतरण म्हणतात.

धमक्या, दबाव किंवा प्रलोभन देऊन एखाद्या व्यक्तीला धर्मांतर करण्यास भाग पाडले जाते. काही प्रकरणांमध्ये, त्या व्यक्तीला हे देखील कळत नाही की ते नकळत दुसऱ्या धर्मात सामील होत आहेत.

धर्मांतराला विरोध करण्यासाठी काही राज्यांमध्ये धर्मांतरविरोधी कायदे देखील आहेत, जे धर्मांतराला प्रतिबंधित करतात किंवा धर्मांतर करण्यापूर्वी परवानगी आवश्यक असते.केंद्र सरकारने याबाबतीत अजून देखील कायदा केलेला नाही.

भारतात धर्मांतर विरोधी कायदा सध्या राष्ट्रीय स्तरावर अस्तित्वात नाही, परंतु अनेक राज्यांनी असे कायदे केले आहेत. या कायद्यांचा उद्देश जबरदस्तीने किंवा प्रलोभनाने केलेले धर्मांतर रोखणे किंवा त्याचे नियमन करणे आहे.भारतात छत्तीसगड, गुजरात, हरियाणा, हिमाचल प्रदेश, झारखंड आणि कर्नाटक या राज्यांनी हेमंत विरोधी कायदे केलेले आहेत.

## आकर्षक बक्षिस योजना

वास्तुशास्त्र पेंटींग या अनोख्या विषयावरील "लघु लेखमाला" एका सप्ताहातच वाचकप्रिय होऊ लागली आहे.या लघुलेख मालेचे लेखक,हे जगप्रसिद्ध वास्तुशास्त्र आणि रंग शास्त्र तज्ज्ञ आहेत. त्यांना अनेक जिज्ञासू वाचकांचे फोन होताहेत. अशा वेळी, जेव्हा क्रमशः लेख क्रम राहून जातो.या लेखमालेतील प्रत्येक लेख हा कुठल्यातरी बाबीचा संदर्भ असु शकतो.म्हणून एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान आणि ज्योतिर्मय यांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही एक योजना आणली आहे. "वास्तुशास्त्र पेंटींग या लघुलेख मालेचे क्रमवार लेख दर महिन्याला जमा करून जो किंवा जे वाचक, ज्योतिर्मय च्या कार्यालयाकडे पाठवतील त्यापैकी भाग्यवान क्रमांकांना एस्.व्ही.एस्.कला प्रतिष्ठान कडून आकर्षक पारितोषिक प्रदान करण्यात येईल.

# गुणवंत विद्यार्थांनी आपल्या गुणवत्तेचा उपयोग देशाच्या प्रगतीसाठी करावा - विंग कमांडर अविनाश मुठाळ (नि.)

## केशव माधव विश्वस्त निधी तर्फे गुणवंत विद्यार्थांचा गौरव

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – केशव माधव विश्वस्त निधी तर्फे पुणे जिल्ह्यातील दहावी मध्ये अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उत्तुंग यश मिळविलेल्या तसेच नववी मध्ये यश संपादन करून दहावी मध्ये प्रवेश घेतलेल्या अशा एकूण ४० विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ कर्वेनगर येथील ‘‘सरस्वती विद्या मंदिर‘‘ च्या सभागृहात उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र टाईम्सचे निवासी संपादक श्रीधर लोणी तर प्रमुख पाहुणे म्हणून विंग कमांडर अविनाश मुठाळ (निवृत्त) हे होते. पुणे जिल्ह्यातील विविध शाळांमधील एकूण चाळीस यशस्वी गुणवंत विद्यार्थांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. रोख बक्षीस प्रत्येकी एक हजार एक, प्रशस्तीपत्र, पुष्पगुच्छ व प्रेरणादायी पुस्तक देऊन विद्यार्थांना गौरविण्यात आले. सेवा सहयोग फाऊंडेशन तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांना




स्कूल किट्स देण्यात आले. ह्या प्रसंगी केशव माधव चे विश्वस्त रवी जावळे, सचिव अरविंद देशपांडे, सरस्वती विद्यामंदिर च्या कार्यवाह संध्या डंबीर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संभाजीभाग संघचालक अनिल व्यास यांची मुख्य उपस्थिती होती.

‘‘विद्यार्थ्यांमधील सुप्तगुण ओळखून त्यांच्या क्षमतेचा विकास करण्याकडे कल असला पाहिजे. आजच्या स्पर्धात्मक युगात फक्त अभ्यासात हुशार असणे पुरेसे नसून यशस्वी होण्यासाठी मानसिकदृष्ट्या सशक्त असणे गरजेचे आहे. योग्य मार्गदर्शन, वेळेचे नियोजन व भावनिक समतोल या तिन्ही गोष्टीचा समावेश त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात झाला पाहिजे. ‘‘अशा शब्दात कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विंग कमांडर (निवृत्त) अविनाश मुठाळ यांनी मार्गदर्शन केले. ‘‘गुणवंत विद्यार्थांनी आपल्या आई वडिलांनी घेतलेल्या कष्टांची जाणीव ठेवावी तसेच आपल्या गुणवत्तेचा राष्ट्राच्या प्रगतीसाठी उपयोग करावा व देशाला अभिमान वाटेल असे कार्य त्यांनी करावे‘‘, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र टाईम्सचे निवासी संपादक श्रीधर लोणी हे होते.अध्यक्षीय भाषणात श्रीधर लोणी म्हणाले,‘‘प्रतिकूल परिस्थिती असूनही ह्या विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे अशा विद्यार्थांना राष्ट्रीय शैक्षणिक प्रवाहात आणणे आवश्यक आहे.केशव माधव सारख्या संस्था अश्या गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करीत आहे ही समाजाच्या दृष्टीने समाधानकारक गोष्ट आहे.राष्ट्राची व समाजाची प्रगती या पुढच्या पिढीवरच अवलंबून आहे.‘‘

सुरवातीस रवी जावळे यांनी अविनाश मुठाळ व श्रीधर लोणी, यांचे तर अरविंद देशपांडे यांनी संध्या डंबीर व अनिल व्यास यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रशांत कुलकर्णी यांनी केले.केशव माधव संस्थेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या विविध समाजकार्याची माहिती अरविंद देशपांडे यांनी दिली.विश्वस्त प्रकाश देशपांडे यांनी आभार मानले.संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंती निमित्त उन्नती वैद्य व संगीता कोरडे ह्यांनी पसायदान गायिले.उपस्थित विद्यार्थांना यावेळी खाऊचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास सरस्वती विद्यामंदिर चे अध्यक्ष राजेश भांडारकर,कार्यवाह संध्या डंबीर, मुख्याध्यापक उन्नती वैद्य तसेच ज्ञानदा प्रशाला व ग.रा. पालकर शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आर्थिक सुधारणांचे बिगुल - नरेंद्र मोदींची सिंहगर्जना

**ज्योतिर्मय साहित्य**


स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्याच्या



प्राची वरून देशाला उद्देशून संबोधन म्हणजे अभिभाषण करण्याची प्रदीर्घ परंपरा आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यापासून ते २०२५ च्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कालच्या भाषणापर्यंत मागील इतिहासाचा धांडोळा घेतला असता असे दिसते की पंतप्रधान मोदी यांचे १०३ मिनिटांचे भाषण त्यांचा मागील वर्षाचा विक्रम मोडणारे ठरले आहे तसेच सतत सतरा वेळा होतो. पूर्व पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी लाल किल्ल्याच्या प्राचीवरून देशाला उद्देशून मार्गदर्शन केले होते त्याचाही विक्रम मोदी यांनी मोडला आणि नवा इतिहास घडविला यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या या भाषणातील सातत्य प्रवाहीपणा ओघ आणि ओजस्वी राष्ट्रीयत्वाचा अविष्कार पाहता त्यांचे हे भाषण हे आजवरच्या भाषणातील अप्रतिम अभिव्यक्ती म्हणून नोंदविले पाहिजे त्यांच्या भाषणातील ठळक मुद्दे आणि आशयाचे शास्त्रीय दृष्टीने आकलन केले असता जिथे समोर येतात त्यांचे परिशिलन या लेखात केले आहे. पंतप्रधानांनी लोकशाही मूल्यांची ध्वजा उंच उंच फडकवित ठेवली आणि असे प्रतिपादन केले की गेल्या ७५ वर्षापासून भारतीय संविधानाने आपल्या सर्वांसाठी मार्गदर्शक दीपस्तंभ चे कार्य केले आहे असे म्हणून त्यांनी संविधान निर्मात्यांना वंदन केले. आणि त्यामध्ये महिलांनी बजावलेल्या कार्याचा विशेष उल्लेख केला. नैसर्गिक आपत्ती आपली परीक्षा घेत आहे या आपत्तीमध्ये प्रभावित झालेल्या सर्वांना त्यांनी सर्वा विषयी सहानुभूती आणि आदरभाव व्यक्त केला. त्यांच्या विचार चिंतनातील प्रगल्भता हा या भाषणाचा आत्मा होय त्यातील प्रमुख मुद्दे क्रमाने पुढीलप्रमाणे मांडले आहेत.

### आर्थिक सुधारणा केंद्रबिंदू

गेल्या ११ वर्षात भारताने केलेल्या प्रदीर्घ सातत्यपूर्ण कामगिरीमुळे भारत आज जगातील चौथी आर्थिक सत्ता बनला आहे. आणि तिसऱ्या स्थानाच्या दिशेने झेपावत आहे या पार्श्वभूमीवर ७९ व्या स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान यांनी केलेल्या भाषणाचा केंद्रबिंदू आर्थिक सुधारणांना गती देणारा आहे.




दिवाळीपूर्वी म्हणजे ऑक्टोबर २०२५ पर्यंत जीएसटी मध्ये सुधारणा करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला केंद्र सरकार वस्तू आणि सेवा कर रचनेमध्ये मौलिक सुधारणा करेल, आवश्यक वस्तूवरील करांचे दर कमी करण्यात येतील आणि घरे निवासस्थाने तसेच लहान व्यवसायांना फायदा कसा होईल यासाठी चौकट म्हणजेच स्लॅब सुव्यवस्थेत करण्यात येईल हे बदल लक्षणीय आहेत जगामध्ये आर्थिक मंदीची संभाव्यता आणि ट्रम्प यांच्या सैराट धोरणामुळे अशा सुधारणा करणे अपरिहार्य झाले होते.

या आर्थिक सुधारणा मध्ये आणखी एक पैलू म्हणजे रोजगार निर्मितीचा होय, विशेषतः एक लाख कोटी रुपयांची युवा रोजगार योजना सुरू करण्यात येणार आहे प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना खऱ्या अर्थाने क्रांतिकारक आहे खाजगी क्षेत्रातील उद्योजकांना पहिल्यांदाच नोकरी शोधण्यासाठी प्रयत्न करताना प्रोत्साहन दिले जाणार आहे. नव्या उद्योजकांना तरुणांना आपल्या व्यवसायात सामील करून घेण्यासाठी एक वेळ पंधरा हजार रुपयांचे अनुदान प्राप्त होईल या सर्व योजनेत ३.५ कोटी लाभार्थींना त्याचा फायदा होईल. देशांमध्ये कौशल्य प्राप्त केलेल्या युवकांमध्ये असलेले बेकारीचे नैराश्य दूर करावे आणि उद्योगधंद्यात तरुणांना समाविष्ट करून एमएसएमइ म्हणजे लघु व मध्यम उद्योग क्षेत्राला नवी संजीवनी देण्याचा हा प्रयत्न आहे त्यामुळे भारताला जागतिक अर्थव्यवस्थेस तिसरे स्थान प्राप्त करून घेण्यासाठी एक दमदार पाऊल पुढे टाकता येईल.

वर्ष अखेरीस देशांमध्ये स्वदेशी बनावटीच्या सेमीकंडक्टरची निर्मिती हे सुद्धा आणखी एक महत्त्वाचे धाडसी पाऊल आहे. जगातील चिप्स बाजारामध्ये भारताच्या या स्वदेशी सेमीकंडक्टरचे पदार्पण झाल्यामुळे भारताची माहिती तंत्रज्ञान आणि या क्षेत्रातील घोडदौड पुढे गतीने चालू राहण्यासाठी मदत होणार आहे भारतीय इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाला या सेमीकंडक्टर मुळे नवी संजीवनी मिळेल तसेच सध्याची विदेशी आयात कमी होऊन परकीय अवलंबून सुद्धा हळूहळू कमी होत जाईल सध्या चालू असलेले सहा प्रकल्प आणि त्यात चार नव्या प्रकल्पांची भर पडली आहे त्यामुळे एकूण दहा प्रकल्पातून सेमीकंडक्टर उद्योग सुरू होतील आणि भारताची आर्थिक शक्ती आणि या क्षेत्रातील मोठे भरारी त्यामुळे शक्य होईल अशाप्रकारे हे तीन उपक्रम आर्थिक क्षेत्रातील भारताच्या स्वदेशी नारा बुलंद करणारे आहेत आत्मनिर्भर भारताच्या अभ्युदयाची ही पहाट आहे **(क्रमशः)**

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख - 19



'कर्क' राशीच्या व्यक्तीच्या वास्तुमध्ये, कशा प्रकारचे "वास्तुशास्त्र पेंटींग" असायला हवे? याची माहिती आपण घेऊयात. मुळात ही राशी जल तत्वाची आहे. स्त्री प्रधान रास असल्याने अशा व्यक्ती संवेदनशील परंतु एकांतप्रीय असतात. राशी स्वामी 'चंद्र' असल्याने पांढरा-नीळा-आकाशी अशा रंगांचा प्रभाव या राशीवर असतो.

'पुष्य' आणि 'आश्लेषा' या नक्षत्रावर जन्मलेल्या व्यक्ती कर्क राशीच्या असतात. आराध्य वृक्ष "पळस"असल्याने आपल्याला एक मराठीतील म्हण आठवेल... "कोठेही जा... पळसाला पाने तीनच...!!

'कर्क' राशीच्या व्यक्तींनाही असाच अनुभव येतो. म्हणून यांच्यासाठी 'वास्तुशास्त्र पेंटींग' फार महत्वाची भुमिका बजावते. आपण कितीही संवेदनशीलतेने वागत असलो तरी आपल्याबद्दल गैरसमज, अफवा, व्देषभावना आणि बरंच कांही आपल्या मनाविरुध्द घडत असते... याचा अनुभव या व्यक्ती सतत घेत असतात. असे घडू नये यासाठीचे रंग आकार- प्रतिके यांचं संकल्पन विशिष्ट पध्दतीने चितारल्या नंतर निर्माण होणारे 'पेंटींग' या व्यक्तींना खूप फायदा देऊन जाते.फक्त त्यांनी असे खास बनवलेले पेंटींग त्यांच्या वास्तु मध्ये ठेवावे एवढेच...!! फायदा होतो. त्या व्यक्ती, ज्या ठिकाणी बसतात तिथेच नजरे समोर भिंतीवर हे पेंटींग ठेवावे.

'पिंपळ' आणि 'नागचाफा' हे अनुक्रमे 'पुष्य' आणि 'आश्लेषा' या नक्षत्रांचे आराध्य वृक्ष आहेत. त्या नक्षत्रांचे आराध्य देव 'बृहस्पती' आणि 'सर्प' या देवता यांच्या प्रतिकात्मक आकारांसह विविध घटकांच्या प्रतिकाकारांचं एक सुंदर 'संकल्पन' म्हणजे खास 'कर्क' राशीच्या जातकाने माझ्या कडून, अभ्यासाच्या चिंतनानंतर साकारलेले 'वास्तुशास्त्र पेंटींग" होय.

या पेंटींग मध्ये त्या विशिष्ट 'कर्क' राशीच्या जातकाची माहिती घेवून तत्संबंधीचे तपशील 'पेंटींग' विषयात समाविष्ट केले जातात. म्हणून असे पेंटींग, हे त्या त्या 'कर्क' व्यक्तीं साठी एकमेव च असते. दुसऱ्या कर्केच्या जातकाला पहील्या कर्केच्या जातकाचे पेंटींग लागू होत नाही.

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




## जात्यावरच्या ओव्या......

बहिण श्रीमंत
काय होईन भावाला ?
भाऊ श्रीमंत,
आशा बहिणीच्या जीवाला ||२०९||

वैराळे दादा ( कासार)
हात नाही महा रिता
दादाच्या गावाहून
पाव्हणी आले आता ! ||२१०||

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## लोकमाता अहिल्याबाई होळकर - भाग १



उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

अहिल्याबाईंनी आपल्या कार्याने हे सिद्ध केलं की उत्तम राज्यकर्त्याचा पाया स्त्री किंवा पुरुष असा लिंगाधिष्ठित नसतो, तर मूल्यांवर आधारित असतो. त्यांचे जीवन म्हणजे कठीण परिस्थितीवर मात करून कर्तव्यानिष्ठेने उभं राहण्याचं उदाहरण आहे. त्यांनी केवळ इंदूरसारख्या संस्थानात शासन केलं नाही, तर भारतभर मंदिरे बांधून, धर्मस्थळांचा जीर्णोद्धार करून एक अध्यात्मिक चळवळही चालवली. त्यांनी दिलेलं योगदान इतकं समृद्ध आहे की आजही त्या केवळ ऐतिहासिक नव्हे, तर प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून स्मरणात आहेत.



त्यांचं राज्य म्हणजे लोककल्याण, नैतिक मूल्यं, न्याय, आणि धर्मसहिष्णुता यांचं मूर्तिमंत रूप होतं. राजा हा प्रजेचा सेवक असतो  हे तत्व त्यांनी फक्त बोलून नाही, तर आपल्या कृतीतून दाखवलं. त्यांच्या न्यायनिवाड्याच्या अनेक कथा आजही मोठ्या आदराने सांगितल्या जातात.


अहिल्याबाईंची कामगिरी समजून घ्यायची असेल, तर त्यांच्या जीवनप्रवासाचा बारकाईने मागोवा घ्यावा लागेल  एक सामान्य मुलगी ते राणी, राणी ते सत्ताधीश आणि अखेर लोकमाता असा झालेला त्यांचा प्रवास नुसता प्रेरणादायी नाही, तर आजच्या काळातही अनुकरणीय आहे. त्यांचा हा जीवन प्रवास आजच्या राज्यकर्त्यांना देखील मार्गदर्शक आहे.

आज जेव्हा शासनकर्त्यांकडून जबाबदारीचा अभाव, नैतिक अध:पतन आणि जनतेपासून दुरावलेली धोरणं दिसतात, तेव्हा अहिल्याबाई होळकरांचे कार्य एखाद्या तेजोदीपासारखे मार्गदर्शक ठरते. स्त्री सत्तेचा हा आदर्श आपल्या इतिहासात किती खोलवर रुजलेला आहे हे लक्षात घेण्यासाठी आपल्याला त्यांच्या जीवनाचा अभ्यास करावाच लागेल.

या महाराष्ट्र कन्येचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या लहानशा गावी झाला. त्यांच्या वडिलांचं नाव माणकोजी शिंदे आणि आई सुशीला तथा अंबाबई  हे दोघेही कष्टकरी मेंढपाळ होते. आर्थिक दृष्ट्या परिस्थिती सर्वसामान्य होती पण त्यांचं मन उदार आणि प्रबुद्ध होतं.

अहिल्याबाई लहानपणापासूनच शांत, मनस्वी, बुद्धिमान आणि जिज्ञासू म्हणून ओळखल्या जात. त्यांच्या घराजवळ असणाऱ्या मारुती मंदिरातील तात्या पंतोजी तेथील काही मुलांना शिकवत. त्यांचा या चुणचुणीत मुलीवर फार जीव होता. त्यांच्या आणि आई-वडिलांच्या सत्संगामुळे अहिल्याबाई विविध संस्कारांनी संस्कारीत होत्या. संतांचे अनेक अभंग, आरत्या त्यांना तोंडपाठ झाल्या होत्या. अनेक पुराणकथांचे श्रवण करून त्यातील बोध त्यांनी अंतरंगात मुरवला होता.

त्या काळात मुलींना शिक्षण देणं हे फारसं प्रचलित नव्हतं. पण माणकोजींनी या परंपरेविरुद्ध जाऊन आपल्या मुलीला लिहिणे-वाचणे शिकवले. वयाच्या सातव्याआठव्या वर्षीच तिने रामायण, महाभारत आणि संतवाङ्मय याचा अभ्यास सुरू केला होता.
**(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६


## शुध्दज्ञान निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

म्हणून परावाणी सुध्दा तेथे पोहचू शकत नाही. अहंभाव पूर्णपणे नाहीसा होतो, मला ज्ञान आहे ही जाणीव अज्ञान समजली जाते असे अत्यंत मलरहित, शुद्ध जे स्वरूपभान असते त्याला ज्ञान म्हणतात. स्वस्वरूपभानामध्ये माया मावळते. म्हणून द्रुष्याचे भान उरत नाही ज्ञानाने अज्ञान नाहींसे होते. पूढे ते ज्ञान स्वस्वरूपात एकरूप होते. तिथे ‘‘मी जाणतो‘‘ हे उरत नाही. कोणत्याही भेदाचा द्रुश्याचा, विकल्पाचा मल नाही म्हणून ते स्वस्वरूपाच्या अंत:करणात अति निर्मळ व शुद्ध आहे.

देहबुद्धीच्या तीन अवस्था ओलांडून चौथ्या अवस्थेत प्रवेश केला की आत्मबुद्धी उदय पावते. पण ही सुद्धा मावळून केवळ स्वरूप उरणे हे खरे ज्ञान समजावे. तुर्या ही चौथी अवस्था सर्वांना दिसते ती सर्वसाक्षीणी असते. म्हणून तर तिला आत्मज्ञान म्हणतात. परंतु त्या अवस्थेत साक्षित्वाने पदार्थज्ञान असते. यासाठी ते पूर्ण ज्ञान असु शकत नाही. पदार्थ ज्ञान म्हणजे द्रुष्य पदार्थ जाणणे होय. द्रुष्य पदार्थ जाणणे होय. द्रुष्यरहित शुद्ध स्वरूप जाणणे म्हणजे आत्मज्ञान होय. ज्या आत्मस्वरूपाच्या जवळ स्वरूपा खेरीज काहीच उरत नाही तेथे सर्वसाक्षीपणा असु शकत नाही. म्हणून तुर्येमध्दै होणारे ज्ञान आत्मज्ञान मानु नये. कारण त्यात प्रत्यक्ष द्वैत आढळते. म्हणून शुद्ध आत्मज्ञान स्वतंत्र आहे.   उपनिशदामधील महावाक्यांमध्ये आत्मज्ञानाचे सर्व रहस्य साठवले आहे. पण त्याचा नुसता जप करून चालत नाही. त्यावर मनन करून त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला पाहिजे. जे शुद्ध परमात्मस्वरूप आहे तेच आपण आहोत असा जो साक्षात अनुभव येतो. त्यालाच शुद्ध स्वरूपज्ञान असे म्हणतात. महावाक्यांचा उपदेश फार चांगला आहे, पण या ओवीत त्याचा जप करण्यास सांगितलेला नाही , तेव्हा साधकाने महावाक्याचा, अर्थाचा विचार करावा ते समजून घ्यावे. **(क्रमशः)**

## जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण ।।



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ।। परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ।। जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ।। विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ।। मान, अपमान, जगाचे सुख-दु:ख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ।। अभिमानात परमात्म्याचे विस्मरण । हें जीवपणाचें मुख्य लक्षण ।। सुख-दु:ख, विपत्ति-आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती ।। आत्मनिश्चय बाणल्यावांचून । माया न हटे न सुटे जाण ।। आता करी शूर मन । मायेसी हटवावे आपण ।। जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें ।। एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान ।। ज्याच्यांत मानावें मी सुख । त्याच्यातच उद्भवतें दु:ख ।। नराचा होय नारायण । जर न चुकला मार्ग जाण ।। जेथे ठेवावी आस । त्याचे बनावें लागतें दास ।। देह तो पंचभूतांचा । त्याचा भरवसा न मानावा फारसा ।। मी तुम्हांस सांगतों हित । दृश्यांत न ठेवावें चित्त ।। दृश्य वस्तु नाशिवंत असते । भगवत्कृपेने समाधान येतें ।। परिस्थिति नसे बंधनास कारण । असे आपलेच मनाची ठेवण ।। देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण ।। विषयाचा नाही झाला जोंवर त्याग । तोंवर रामसेवा नाही घडत सांग ।। आपलें आत्यंतिक हित । हेंच खरा स्वार्थ जाण ।। चित्तीं जे विषयापासून सुटले । ते आनंदासी आले ।। रामनाम प्रेमयुक्त चाले धणी । त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ।। द्रव्यदारावर्जित जाण । ही खरी संताची खूण ।। सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी । त्याला नाही दुसरी सरी ।। आल्यागेल्यास द्यावे अन्नदान । मुखानें भगवंताचें नाम । हृदयांत रामाची प्रीति । यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ।। न धरावी जगाची आस । तोच होऊ पाहे रामदास ।। नामांत संत । नामीं भगवंत ।। वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेंच संताचें मुख्य लक्षण जाण ।। जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण ।। अगरबत्ती जळून गेली । परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन । तेच खरे जिवंत जाण ।। संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति । भगवन्नामानें साधते ।। देहासकट माझा प्रपंच । रामा केला तुला अर्पण ।। ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ।।

## ।। संत महात्म्य ।।

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### जगद्गुरु संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांचा अभंग (भाग दोन)

ज्योतिर्मय साहित्य

बेरीज. तणाव स्थिती
० ते १४९. कमी
१५० ते २०० मध्यम
२०१ते ३००. तिव्र
३०१च्या वर अति तिव्र

या मोजमापावरून प्रत्येकाने आपण खरंच किती तानात आहोत हे पहावे व मध्यम ते तीव्र आणि अति तीव्र या तणाव परिस्थितीमध्ये या तानाचा परिणाम शरीरावर देखील झाल्याखेरीज राहत नाही तणावग्रस्त व्यक्तीचा व्यवहार कसा असतो ते आपण आता पाहू

१ होणाऱ्या त्रासाबद्दल अशा व्यक्ती अति संवेदनशील असतात
२ आत्मविश्वासाचा अभाव असतो
३ पुन्हा तीच परिस्थिती उद्भवली तर पुन्हा तोंड देण्याची हिंमत नसते
४ इतरांच्या हेतूबद्दल शंका असते
५ अशा व्यक्तींना जास्त मित्र नसतात
६ स्वतः अपराधीपणाची भावना ठेवतात
७ तणावग्रस्त व्यक्तीच्या लघवीतील फॉस्फुरिक ऍसिड मध्ये वाढ होते.

तणावाला अगदी किरकोळ कारणही पुरते जसे गोंगाट सहन न होणे पत्नीचे नीट नेटके न दिसणे आई-वडिलांचे भांडण इत्यादी किरकोळ कारणावरूनही तणाव येऊ शकतो.

तणावामुळे होणारे आजार :

१डोकेदुखी २ मासिक पाळीचा त्रास ३अन्य वेदना ४ लघवीचे अधिक प्रमाण ५ बद्धकोष्ठता ६ अपचन ७ ओटी पोटात दुखणे ८ अधू - दृष्टी ९ चिंतेचा पारा अधिक असतो १० मद्य सेवन ११ मनशांती साठीची औषधे १२ झोपेच्या गोळ्याचे सेवन १३  डॉक्टर यांच्यावर प्रसन्न असतात (नित्य उत्पन्नाचे साधन म्हणून)

तणावामुळे आणखीही काही समस्या उद्भवतात. जसे १. सुखी असल्याचे वाटत नाही २. हृदयाचे ठोके वाढतात ३. छातीत दुखते ४. पोटावर ताण पडतो ५. उलट्या वारंवार होतात ६. जुलाब होतात ७ धाप लागते ८ गुदमरल्या सारखे वाटते ९. निश्वास टाकण्याची सवय १० कारण नसताना चक्कर येते ११. दरदरून घाम येतो १२. थंडी वाजून येते १३. वारंवार लाज वाटते १४. किरकोळ गोष्टीवरून ओरडतात १५. प्रतिक्रिया व्यक्त करणे कठीण जाते.१६. चुळबूळ चालू असते १७. भीतीने थरथर कापतात १८ स्वतःभोवती गिरक्या घालतात १९. अंगात त्राण शिल्लक राहत नाही. २०. सहजगत्या थकतात २१. झोपताना त्रास होतो २२. बोबडी वळते २३. यांना स्वप्न जास्त पडतात.

वरीलपैकी सर्वच लक्षणे प्रत्येक व्यक्तीत दिसत नाहीत तर काही लक्षणे दिसतात.

मनावर तणाव घेणाऱ्याचे मन चंचल असते. त्यांचे मनात भ्रम तयार होतात. मनात चंचलता आली की मन भूत व भविष्यकाळात जाते व वर्तमान काळातून हटले जाते.असे झाले की चैन आनंद संपला असे समजावे.राग आला की मन चंचल होते, पागल होते.

म्हणूनच मनाची बेचैनी संपवायची असेल तर मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण असे मन प्रसन्न करण्या कसे करावे यासाठीचे जे प्रयोग आहेत ते पुढील भागात आपण पाहू.

## ।। निरूपण ।।



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

३१. अंबानाम-महात्म्य
झालो आज ओला चिंबा। पेईले मी भक्तीथेंबा।
नको होणे कोरडा। पुरे भवाचा गराडा।
अंबाबाई अंबाबाई। नाम मुखी सदा घेई।
काव काव भवाची। चंद्रहासे भय नाही।।

३२. भक्ती
स्वर मुखी आम्हा नाही। शब्द वेडे बोले काही।
सुख वेडेपणे काही। जाणत शहाणे नाही।
माय आम्हा वेडे ठेवी। तव भक्ती परि देई।
चंद्रहास म्हणे माई। गोड नाम मुखी देई।।

३३. अंबानामवंदना
अंबा शांभवी माधवी। राधा वैष्णवी वासवी।
सती कमला शामला। बाला बगला अर्गला।
रमा पार्वती भारती। उमा गायत्री सावित्री।
स्वाहा जगन्नायिका। हास वंदितो रेणुका।।



आरोग्य संजीवनी

## नियमित खजूर खाल्ल्याने काय होतं?

ज्योतिर्मय साहित्य

वेगवेगळ्या ड्राय फ्रूट्सचे आरोग्याला किती फायदे होतात हे सगळ्यांनाच माहीत आहे. बदाम, काजू, अक्रोड यासोबतच खजूरही खूप महत्वाचं आहे. खजूर खाण्याचे शरीराला अनेक फायदे मिळतात. आयुर्वेद नुसार खजूर थंड असतं आणि पित्ताची समस्या दूर करण्यासाठी याने खूप फायदा मिळतो. सोबत शरीराला इतरही अनेक फायदे मिळतात. पण ते खाण्याची योग्य पद्धती अनेकांना माहीत नसते.

खजूरामध्ये फयबर, आयर्न, कॅल्शियम, व्हिटॅमिन आणि मॅग्नेशिअम भरपूर असतात. तसेच यात व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन डी सारखे पोषक तत्व असतात. यात अँटी ऑक्सिडेंटही असतात. त्याशिवाय यात पोटॅशिअम, फॉस्फोरस, मॅग्नेशिअम सारखे पोषक तत्व असतात.

आयुर्वेद डॉक्टर दीक्षा भावसार यांच्यानुसार, जर तुम्हाला खजूराकडून जास्त फायदा मिळवायचा असेल तर तुम्ही ते भिजवून खाल्ले पाहिजे. चला जाणून घेऊ फायदे.

भिजवलेले खजूर खाण्याचे फायदे
बद्धकोष्ठता दूर होते
हृदयासाठी चांगले
कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्यास मदत
हाडे मजबूत होतात
ब्लड प्रेशर कंट्रोल
पुरूष आणि महिलांची लैंगिक क्षमता वाढवतात.
मेंदुसाठी फायदेशीर
कमजोरी दूर होते
रक्ताची कमतरता दूर होते
सूज कमी करतात
त्वचा आणि केसांसाठी फायदेशीर

रिकाम्या पोटी खजूर खाण्याचे फायदे

१) वजन होईल कमी :
सकाळी रिकाम्या पोटी खजूर खाल्ल्याने तुमचं वाढलेलं वजन कमी होतं. अशात ज्यांना वजन कमी करायचं आहे त्यांनी झोपेतून उठल्यावर खजूर खावे. याने बराच वेळ पोट भरलेलं राहतं. अशात तुम्ही अनावश्यक खाणं टाळू शकता.

२) वाढेल एनर्जी :
जर तुम्ही रोज सकाळी रिकाम्या पोटी खजूर खाल तर शरीरात दिवसभर एनर्जी कायम राहते. यात आयरन भरपूर असतं. ज्यामुळे शरीरात हीमोग्लोबिनची लेव्हल वाढते. तसेच तुमच्या भरपूर एनर्जी राहते.

३) डायजेशन होईल मजबूत :
ज्या लोकांना नेहमीच पोटात गडबड असते, त्यांनी सकाळी रिकाम्या पोटी खजूर खावे. यातील फायबरमुळे डायजेशन आणि पोट साफ होण्याची प्रक्रिया सोपी होते. ज्यामुळे बद्धकोष्ठता आणि गॅसची समस्या दूर होते.

एका दिवसात किती खजूर खावे?
डॉक्टरांनी सांगितलं की, सगळ्या वयातील लोकांनी दिवसातून २ खजूर खाण्यास सुरूवात करावी. वजन वाढवणाऱ्यांनी रोज ४ खजूर खावेत.

खजूर भिजवून का खावेत?
भिजवल्याने खजूरातील टॅनिन आणि फायटिक ॲसिड निघून जातं. ज्यामुळे पोषक तत्व सहजपणे अवशोषित करण्यास मदत मिळते.

भिजवलेले खजूर लवकर पचतात. जर तुम्हाला खजूराचे जास्त फायदे हवे असतील तर ते रात्री ८-१० तास भिजवून ठेवा.

***

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

## ।। श्री राम कथा ।।





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

नथनी दी जिस यारने उसे याद करते बार बार  नाक दिया जीभ भगवान ने उसे भुलाये नार

सुग्रीवाला तू विसरलास हे जेव्हा सांगितले तेव्हा तो सुधारला. मग सीता मातेचा शोध सुरू झाला. समुद्र उल्लंघन करून कोण जाईल. हनुमान आपल्या शक्ती, ऋषीच्या शापाने विसरला होता प्रभूने त्यास त्याच्या सामर्थ्याची आठवण करून दिली. तिथे संपाती भेटला. तो जटायू याचा भाऊ होता. त्याला जटायू चे वृत्त कळले. त्याने सांगितले की समुद्राच्या त्या पलीकडील किनाऱ्यावर मी एक स्त्रीस सतत राम नाम घेताना पाहिले आहे. आता दिशा निश्चित झाली. आता समुद्र उल्लंघन करुन कोण जातो हे ठरले. मारुती राय यांनी उड्डाण केले. लंकेत उतरले. लंका ही अलौकिक नगरी होती.तिथे सोन्याची, तांब्या पितळेची, दगड, मातीची घरे होती. ते सर्वत्र फिरले. लंकेकडे जाण्यापुर्वी हनुमान रामा जवळ गेले व विचारले, आम्ही सीतेला कसे ओळखावे. रामांनी तयास कांहीं गुह्य गोष्टी सांगितल्या ज्या केवळ राम व सितेसच माहित होत्या. त्यांनी हनुमंताजवळ सितेला ओळख पटविण्यासाठी एक अंगठी दिली.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

हनुमान रावणाच्या अंतपुरात, सीतेच्या शोधात फिरला. तिथे अत्यंत बीभत्स वातावरण होते. याचे वर्णन रामाला नंतर त्यांनी सांगितले. तिथे रावणाच्या अनेक स्त्रिया वस्त्र हीन अवस्थेत पडल्या होत्या. मग तुझ्या ब्रह्मचर्याचे काय? असे रामांनीच हनुमानास विचारले. तो म्हणे तिथे उघड्या नागड्या रावणाच्या स्त्रिया होत्या पण माझे चित्त किंचितही ढळले नाही. **(क्रमशः)**

## फुलमाला....





कण्हेर....

पांढरा,गुलाबी, लाल रंगात
कण्हेर दिसते खूपच सुंदर
बाराही महिने या फुलांचा
संपत नाही कधीच बहर

लांबट हिरव्या पानांमध्ये
टवटवीत गुच्छ या फुलांचे
देवचरणी ही फुले खुलती
रस्त्याकडेचे हे झाड शोभेचे

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य


ज्योतिर्मय साहित्य

# मैत्रीपर्व : गुरुदेव आणि लोकमान्य टिळक

गुरुदेव आणि लोकमान्य टिळक या दोघांनाही एकमेकांबद्दल प्रचंड आदर होता. जेव्हा पहिले महायुद्ध अंतिम टप्प्यात आले होते तेव्हा ते जिंकण्यासाठी ब्रिटिशांना भारताची मदत हवी होती. भारतातील नेत्यांना आवाहन करण्यासाठी त्यांनी दिल्लीमध्ये एका युद्ध परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेचे निमंत्रण मात्र लोकमान्य टिळकांना नव्हते. परंतु त्यांच्या विश्वासातील दादासाहेब खापर्डे यांना या परिषदेचे निमंत्रण होते. लोकमान्यांनी त्यांना गुरुदेवांची भेट घेण्याचा सल्ला दिला. तसेच बंगालमधील व्योमकेश चक्रवर्ती, कामिनीकुमार चंदा या मंडळींना देखील या परिषदेचे निमंत्रण होते. ही सगळी मंडळी या युद्धपरिषदेला जाण्यापूर्वी गुरुदेवांना भेटली आणि त्यांचा सल्ला घेतला. गुरुदेवांनी त्यांना या परिषदेत कोणती भूमिका घ्यावी याबद्दल सुयोग्य असे मार्गदर्शन केले. रवींद्रनाथ हे एक महान साहित्यिक असले तरी देशाच्या हिताच्या दृष्टीने विचार करणारे एक थोर पुरुष आहेत याची जाणीव या निमित्ताने सर्वांना झाली.

गुरुदेवांनी राष्ट्रीय चळवळीचा युरोपात प्रसार करावा आणि त्यासाठी ठिकठिकाणी व्याख्याने द्यावी या हेतूने लोकमान्यांनी त्यांना त्यासाठी लागणाऱ्या खर्चासाठी म्हणून पन्नास हजार रुपये पाठवले होते. परंतु गुरुदेवांनी ती रक्कम नम्रतापूर्वक परत केली आणि त्यांना असा निरोप पाठवला की राष्ट्रीय चळवळीच्या प्रचारार्थ मी युरोपात व्याख्याने देत फिरावे हे माझ्या मानसिक प्रकृतीला मानवण्यासारखे नाही. पुढे या दोघांची मुंबईला भेट झाल्यानंतर या विषयावर त्यांचे मनमोकळे बोलणे झाले. लोकमान्य गुरुदेवांना म्हणाले की तुम्ही राजकीय व्याख्याने देत फिरावे अशी माझी मुळीच इच्छा नाही. भारताचा जो सत्य संदेश जगाला तुम्हाला सांगावासा वाटतो तोच तुम्ही सांगा. तेच तुमचे खरे कार्य आहे. मला वाटते की मी पाठवलेली रक्कम तुम्ही स्वीकारावी. परंतु राजकीय कामासाठी लोकमान्यांना लोकांनी दिलेली रक्कम आपण स्वीकारावी असे गुरुदेवांना वाटले नाही. त्यांनी याबद्दल लिहिताना असे म्हटले आहे की टिळकांची ही निरपेक्ष उदारता गीतेचे रहस्य सांगणाऱ्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला शोभेशी अशीच होती. गीतेवर भाष्य लिहिण्याचा अधिकार अशा उदार व निरपेक्ष वृत्तीच्या महान व्यक्तिमत्त्वालाच असू शकतो.

राष्ट्रीय सभेचे अधिवेशन दिल्ली येथे भरणार होते. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून गुरुदेवांनी कार्य करावे अशी लोकमान्यांची इच्छा होती. परंतु गुरुदेवांनी सक्रिय राजकारणात भाग घेण्याचे नाकारले. असे असले तरी राष्ट्रीय चळवळीच्या निमित्ताने या महापुरुषांमधील राजकीय आणि सामाजिक विषयांवरील चर्चा सुरूच होत्या. १ऑगस्ट १९२० या दिवशी लोकमान्यांचे निधन झाले. त्यानंतर सुमारे दोन वर्षांनी गुरुदेवांचे पुण्यात आगमन झाले. त्यावेळी त्यांनी पुण्यात लोकमान्यांना आदरांजली वाहणारे एक व्याख्यान दिले. लोकमान्यांच्या स्मृती त्यांच्या हृदयात सदैव जागत्या होत्या.




# भेलके महाविद्यालयात वाचन संस्कृतीसाठी पुस्तक हंडी

ज्योतिर्मय साहित्य

**भोर** – शंकरराव भेलके महाविद्यालयात सांस्कृतिक विभागातर्फे पुस्तक हंडी हा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. गोकुळाष्टमी आणि दहीहंडी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयामध्ये पुस्तक हंडीचे आयोजन सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी साहसी क्रीडा प्रकारात सहभागी झाले पाहिजे. पारंपरिक सण साजरे करत असतानाच पुस्तकांशी मैत्री करून स्वतः ला समृद्ध केलं पाहिजे हाच हेतू या कार्यक्रमाचा होता, असे मत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विद्यार्थी तसेच विद्यार्थींनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाच्या वतीने विद्यार्थांना पुस्तके वाटण्यात आली. विठ्ठल कोळपे, विजय बाटे, आयान मुलानी, हर्षद डिंबळे, निशांत मोरे, प्रणय ओंबळेया विद्यार्थ्यांनी पुस्तकहंडीस सलामी देत कार्यक्रमाची सुरुवात केली. निकिता कोंढाळकर, निशा दीक्षित, पौर्णिमा गोळे, पोर्णिमा कांबळे, नेहा वाल्हेकर, तृप्ती सणस, निकिता माने, सायली गाडे, शुभांगी कोंडे, आदिती गोळे, प्रज्ञा गायकवाड, रिया नाईक, मानसी खोपडे, आरती मिरकुटे, प्रियांका कोकरे या विद्यार्थिनींनी पुस्तक हंडी फोडून कार्यक्रमाची सांगता केली. विजयी संघाला स्पर्धा परीक्षा आणि अभ्यासपूरक पुस्तकांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभागाचे समन्वयक प्रा. संदीप लांडगे आणि सर्व सदस्यांनी प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

याप्रसंगी महाविद्यालयातील डॉ. जगदीश शेवते, प्रा. सहदेव रोडे, डॉ. रोहिदास ढाकणे, प्रा. पौर्णिमा काराळे,



प्रा. भगवान गावित, डॉ. सचिन घाडगे, प्रा.जीवन गायकवाड, प्रा.भूषण समगीर , प्रा. वैष्णवी कोंडे, प्रा. ऐश्वर्या धुमाळ, प्रा. अंकिता महांगरे, प्रा. जाधवर डी.एस., प्रा. महेश कोळपे, प्रा.माऊली कोंडे, डॉ. गणपत आवटे प्राध्यापकेतर कर्मचारी सुमित कांबळे, अभिषेक मोरे, सीमा देशमुख तसेच विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# श्रीयश टेक्निकल कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – श्रीयश प्रतिष्ठानच्या श्रीयश टेक्निकल कॅम्पस येथे ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर चे अध्यक्ष श्री. उत्सव माछर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भारतमाता प्रतिमा पूजनाने झाली. प्रतिमा पूजन श्रीयश प्रतिष्ठानचे बसवराज मंगरुळे, चेअरमन यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर प्रमुख पाहुणे उत्सव माछर यांच्या हस्ते ध्वज फडकाविण्यात आला.

आपल्या भाषणात प्रमुख पाहुणे म्हणाले की, ‘‘छत्रपती संभाजीनगर येथे अनेक नवीन उद्योग सुरू होत आहेत. विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. आपणही या संधींचा लाभ घेण्यासाठी कौशल्यवृद्धीवर लक्ष केंद्रित करावे.’’

या प्रसंगी अभियांत्रिकी, फार्मसी, पॉलिटेक्निक व आयुर्वेद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, नृत्य, नाटिका अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले. पॉलिटेक्निक विद्यार्थ्यांचे ऑपरेशन सिंदूर हे सादरीकरण विशेष दाद मिळवून गेले. तसेच अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी सादर केलेले गटगान देखील उल्लेखनीय ठरले.

चेअरमन आपल्या मनोगतात म्हणाले की, यशस्वी होण्यासाठी व देशाला राहण्यायोग्य बनवण्यासाठी जीवनात शिस्त आवश्यक आहे.

कार्यक्रमाला श्रीयश प्रतिष्ठानचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, डीन अकॅडेमिक्स, सेंट्रल टीपीसी प्रमुख, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# भारताचे स्वातंत्र्य चिरायू होवो !

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

भारतीय लोकांना जातीभेद, धर्मभेद, प्रांतभेद, गरीब-श्रीमंत अशा गोष्टींमध्ये भडकवायचे! मग

काय! तीस कोटीचे तिनशे करोड जरी हिंदू झाले तरी ते आपल्याविरुद्ध उठाव करु शकणार नाहीत. हे जाणून इंग्रजांनी राज्या-राज्याच्या माणसांमध्ये उपरोक्त विषयांमध्ये भांडणे लावली, द्वेष निर्माण केला म्हणजे, ते

एकमेकांनाच मारत राहतील, ठार करतील ही कूटनिति इंग्रजांनी वापरली. त्यामुळे, भारतीय लोक आपापसातच लढत राहिले, तसेच, त्यांच्या सत्तेच्या जाचात राहिले. त्यामुळे, भारतीयांना दिडशे वर्षे इंग्रजांच्या गुलामीत राहावे लागले. म्हणून,भारताच्या, महाराष्ट्राच्या नागरिकांनो अंतर्यामी लक्ष देवून नीट लक्षात घ्या. तुम्ही एवढे मोठे झाला आहात का! की तुम्ही महापुरुषांच्याही वाटण्या केल्या आहेत. पैगंबर मुसलमानांचे झाले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर बुद्धांचे झाले,सावरकर ब्राह्मणांचे झाले, मल्हारराव होळकर धनगरांचे झाले, महात्मा ज्योतिबा फुले माळ्यांचे झाले. इंग्रजांनी भारतीयांची वाताहत केली .

भारतीयांना फसवले हातोहात! भारताच्या स्वातंत्र्याचा ७५वा अमृतमहोत्सव साजरा होवून ७८व्या स्वातंत्र्यदिनालाही अजूनही इंग्रजांनी केलेली भेदनीती अजूनही भारतीय जनतेच्या मनातून गेलेली नाही हेच दिसून येते. हीच भेदनीती राजकारण्यांनी आपल्या स्वार्थासाठी वापरली. अजूनही त्याच वृत्तीचा वापर राजकारण्यांकडून केला जातो आहे. या बाबीकडे सर्व भारतीयांनी अत्यंत गांभीर्याने लक्ष देण्याची नितांत आवश्यकता आहे. अशा त्यांच्या दूष्प्रृत्तीचा सर्व जनतेनी बिमोड केला पाहिजे.



स्वातंत्र्यपूर्व काळात अत्यंत थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य टिळक यांनी हिंदूस्थानच्या स्वातंत्र्य संग्रामात स्वतःचे अमुल्य असे योगदान दिले आहे. ‘‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारंच‘‘ असं त्यांनी इंग्रज सरकारला ठणकावून सांगितलं होतं. स्वतःच्या दैनिक केसरी या वर्तमानपत्रातून अत्यंत निर्भिडपणाने इंग्रज सरकारच्या जुलमी राजवटी विरोधात अग्रलेख लिहून त्या सरकार विरोधात भारतीय जनतेत जनजागृती करीत असत. व देशप्रेम निर्माण करीत असत. त्यासाठीच, लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाचा धार्मिक कार्यक्रम चालू केला. त्याद्वारेच त्यांनी हिंदूस्थानातील सर्व जनतेमध्ये देशनिष्ठेची आणि देशसेवेची भावना अधिकाधिक मजबूत आणि जागृत केली. आजच्या एकविसाव्या शतकाच्या या काळात त्याच भावनेची आणि एकनिष्ठ देशसेवेची अत्यंत आवश्यकता आहे.

दूष्प्रवृत्तीच्या लोकांची आणि दूष्प्रवृत्तीच्या राजकारण्यांची जर अशीच दूष्प्रवृत्ती कायम राहिली तर आपले स्वातंत्र्य अबाधित राहील का! याचा सर्व भारतीयांनी अंतर्यामी गांभीर्याने विचार करावा! आणि भारताचे स्वातंत्र्य अखंडपणे अबाधित ठेवावे. जातपात, धर्माच्या नावाखाली वादविवाद करु नये.एकमेकांशी भांडू नये. स्वातंत्र्यासाठी छत्रपती श्री शिवाजी महाराजांनी अठरा पगड जातीच्या लोकांना एकत्र करुन स्वराज्य स्थापन केले होते. त्यामुळे, सध्या माणुसकी हाच धर्म आहे हे लक्षात ठेवा. तरच,भारतीय स्वातंत्र्य अबाधित राहील. हे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी १८ व्या व१९ व्या शतकातील आपल्या देशातील हजारो स्वातंत्र्य सैनिकांना आपल्या प्राणांचे बलिदान करावे लागले आहे. शेकडों स्वातंत्र्यसैनिकांना अंदमानच्या जेलमध्ये स्वातंत्र्यासाठी अत्यंत हाल अपेष्टा सहन कराव्या लागल्या आहेत. इंग्रज सैनिकांचा अत्यंत क्रूर छळ सहन करावा लागला आहे. थोर स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी त्यांच्या काव्यात स्वातंत्र्याविषयीची तळमळ व्यक्त केली आहे.



■ लेख व काव्यरचना
मधुकर निलेगावकर, पुणे
९४२१३७५६९१

ते म्हणतात, ‘‘ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला! तळमळला सागरा! ने मजसी ने! हीच भावना सर्व स्वातंत्र्यसैनिकांची होती. निर्दयी, क्रूर इंग्रज सैनिकांच्या हंटरच्या माराने झालेल्या रक्ताच्या जखमांतून देशप्रेमातून वि.दा.सावरकरांनी त्यांच्या काव्यातून ही भावना व्यक्त केली आहे. तीच भावना,तळमळ सर्व स्वातंत्र्यवीरांचीही होती. त्यांच्या रक्तातून, बलिदानातून मिळालेले स्वातंत्र्य आपण पुर्णत: अबाधित ठेवले पाहिजे. यात निष्काळजीपणा होता कामा नये हे लक्षात ठेवले पाहिजे. अन्यथा,तोडा फोडा आणि राज्य करा!ही नीती कोणिही अवलंबिल. हे अत्यंत गांभीर्याने लक्षात घ्या. तितक्याच तातडीने त्याची अंमलबजावणी करा बाहेरच्या देशातील कोणी घूसखोरी करण्याचा प्रयत्न केला तर त्यांचा प्रयत्न हाणून पाडा. तसेच, त्यांना त्यांच्यापेक्षा जास्त ताकदीने उत्तर द्याभारताच्या जवानांनी वेळोवेळी हे सिध्द केले आहे, आणि सिध्द करीत आहेत. फक्त समस्त भारतीयांनी लष्कराच्या जवानांना अत्यंत मोलाची साथ दिली पाहिजे, तसेच, सहकार्य केले पाहिजे. एका कवीने समर्पक शब्दांत भारताच्या सार्वभौमतेचे वर्णन केले आहे. ‘‘बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो! हे स्वातंत्र्य अखंडीतपणे अबाधित राहण्यासाठी सामाजिक प्रबोधनाची अत्यंत आवश्यकता आहे. हे प्रत्येक भारतीयाच्या मनावर बिंबवले गेले पाहिजे. तरच,ख-या अर्थाने भारतीय स्वातंत्र्य अबाधित टिकून राहील, यात संशय नाही.

जय हिंद! जय महाराष्ट्र! जय स्वातंत्र्यसैनिक! स्वातंत्र्यदिनानिमित्ताने व सर्व स्वातंत्र्यसैनिक, सैनिक व हुतात्मा झालेल्यांचे मनोगत यावर आधारित माझी स्वरचित कविता या निमित्ताने खूप उपयुक्त होईल. ती खालिलप्रमाणे आहे.

‘‘मनोगत स्वातंत्र्य सैनिकांचे!सैनिकांचे!
देशासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांचे!‘‘

शतदा वंदन! तुम्हा स्वातंत्र्य सैनिकांनो!
सैनिकांनो! हुतात्म्यांनो!

मिळाले जे स्वातंत्र्य तुम्हा सकलांना
अबाधित ते भारतदेशी टिकवून ठेवा
जाणा!हजारो हुतात्म्यांच्या बलिदानाने
स्वातंत्र्य मिळाले आहे भारत देशाला,

म्हणूनि,घेतात उपभोग तुम्ही स्वातंत्र्याचा
अर्थ ध्यानी घ्या नीट,सैनिकांच्या कष्टाचा
आयुष्याचा क्षण क्षण वेचतात ते देशासाठी
रात्रंदिन झटतात भारतीयांच्या रक्षणासाठी

स्वकुटूंबाला सोडून लढतात दूर सीमेवर
मुलाबाळांवर प्रेम असते त्यांचेही अपार
परि, कर्तव्यापूढती नाते राहते खूप दूरदूर
ठसवून घ्या त्यांची शक्ती,भक्ती स्वहृदयावर
***



# दवाखाना

## क्षयरोग- भाग ६

**ज्योतिर्मय साहित्य**

क्षयरोगाची कुठलीही लक्षणे जाणवली तर वेळ न दवडता तपासणीसाठी जवळच्या क्षयरोग केंद्राला भेट अवश्य द्यावी. जराही शंका असेल तरी तिचे या बाबतीत अवश्य निरसन करून घ्यावे. सर्व सरकारी आणि नामनिर्देशित अर्थात निकषांवर आधारित क्षयरोगासाठी कार्यान्वित असलेल्या खाजगी आणि स्वयंसेवी संस्थांच्या क्षयरोग उपचार केंद्रात क्षयरोगाचे निदान तसेच उपचार मोफत उपलब्ध आहेत.



टीबी कल्चर चाचणी किंवा मायकोबॅक्टेरिया कल्चर या प्रक्रियेत सूक्ष्मजीवशास्त्राच्या नामनिर्देशित प्रयोगशाळांमध्ये रोग्याची थुंकी किंवा इतर नमुन्यातील क्षयरोगाच्या जिवाणूंची त्यांना योग्य आहार देऊन जोपासना केल्या जाते. क्षयरोगाचे अंतिम निदान करणारी ही चाचणी आहे. मंडळी हेच समजा की क्षयरोगाची निःशंकपणे पुष्टी करणारे करण्यासाठी हे सुवर्ण मानक आहे. टीबीवर प्रभावशाली असलेल्या बहुतेक औषधांची संवेदनशीलता (सेन्सिटिव्हिटी) चाचणी यात शक्य होते. याच संवेदनशीलतेवर आधारित टीबीचे वर्गीकरण औषधयोजनेसाठी अत्यंत महत्वाचे आहे. या चाचणीनुसार ५ प्रकारचे क्षयरोग आहेत पण सर्वात महत्वाचे बहु-औषध-प्रतिरोधक क्षयरोग (मल्टी ड्रग रेझिस्टंट अर्थात एम. डी. आर. टीबी) आणि अति-औषध-प्रतिरोधक क्षयरोग (एक्सटेन्सिव्हली ड्रग रेझिस्टंट अर्थात एक्स डी आर टीबी). हा एक्स डी आर टीबी क्षयरोगाचा सर्वात गंभीर प्रकार आहे, कारण त्यावर बहुतेक क्षयरोगविरोधी औषधे प्रभावहीन असतात. पहिल्या तसेच दुसऱ्या फळीची औषधे निकामी झाल्यावर रोग्याचा इलाज करणे जवळपास अशक्य होऊन बसते. मात्र या परिस्थितीत तूर्तास एक नवीन प्रभावी औषध उपलब्ध झाले आहे. याउप्पर एच. आय. व्ही. एड्सचा देखील संसर्ग असणाऱ्या रोग्याची अवस्था अतिशय बिकट असते. अशा रुग्णांमध्ये मृत्युदर जास्त असतो. भारतात सध्या बहुऔषध प्रतिरोधक क्षयरोगाचे प्रमाण जवळपास एक लाखात ८. ५ असे आहे (सुमारे १४७००० रुग्ण -जगातील २५ %). त्याचा प्रसार चिंतेची बाब आहे.



लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव

क्षयरोगाविरुद्ध पहिल्या प्रभावी औषधाचा शोध १९५० च्या सुमारास लागला. त्याचे श्रेय सेलमन अब्राहम वॅक्समन यांना जाते. स्ट्रेप्टोमायसिन हे क्षयरोगाच्या जिवाणूंविरूद्ध पहिले प्रभावी प्रतिजैविक होते. यासाठी त्यांना १९५२ साली फिजिओलॉजी / वैद्यकशास्त्रातील नोबेल पारितोषिक देण्यात आले, हे मी आधी सांगितले आहेच. मात्र या इंजेक्शनद्वारे दिल्या जाणाऱ्या प्रतिजैविकाचा इतर जिवाणूंविरूद्ध सर्रास उपयोग आणि त्याचे प्रतिकूल परिणाम यामुळे त्याचा वापर १९७५ च्या नंतर खूप कमी झाला. आता त्याच समूहातील अधिक प्रभावशाली इंजेक्शन अमिकासिन निव्वळ प्रतिरोधक टीबीमध्ये वापरल्या जाते. मैत्रांनो, एक महत्वाचा मुद्दा आपल्या समोर मांडते. क्षयरोगाचा इलाज तज्ज्ञांनी ठरवलेल्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणेच केल्या जातो. संबंधित डॉक्टर मंडळींना याबाबत वारंवार प्रशिक्षण दिल्या जाते. संबंधित उपचारपद्धतींमध्ये होणारे बदल नामनिर्देशित क्षयरोग उपचार केंद्रांमध्ये प्रसारित केले जातात. यामुळे उपचारामध्ये उच्च दर्जाची सुसूत्रता येते. क्षयरोगाचे निर्मूलन करण्याकरता हे समन्वयाचे धोरण फार उपयोगाचे आहे. इथे सर्वात महत्वाचा दुवा आहे सरकारी आणि खाजगी रुग्णालयात विविध वैद्यकीय विभागात कार्यरत असलेली डॉक्टर मंडळी. मात्र यातही सिंहाचा वाटा उचलणारे छातीचे डॉक्टर किंवा फुफ्फुसतज्ज्ञ असतात. क्लिष्ट रोग निदान आणि उपचाराकरता त्यांचा शब्द अंतिम असावा असा दंडक आहे. क्षयरोगाचा नवीन रोगी / जुनाच रोगी (औषधे घेत असलेला/ औषधे घेणे ज्याने थांबवले आहे असा) / रोगमुक्त होऊन नव्याने बाधित झालेला असे विविध प्रकारांचे क्षयरोगी क्षयरोग विभागात येतात.

मंडळी, संवेदनशील क्षयरोगासाठी पहिल्या फळीची औषधे आयसोनियाझिड, रिफाम्पिसिन, पायराझिनामाइड आणि एथॅम्बुटोल ही निहित काळाकरता निहित मात्रेत वापरल्या जातात. आनंदाची गोष्ट ही की ही चारही औषधे निश्चित मात्रा संयोजन (फिक्स्ड डोझ कॉम्बिनेशन) स्वरूपात देता येतात. त्यामुळे रोग्याला कमीत कमी गोळ्या घ्याव्या लागतात. मुलांसाठी वयानुसार अशी औषध संगती उपलब्ध आहे. सर्वांनी एक गोष्ट समजून घ्यावी की, ही औषधे नियुक्त क्षयरोग केंद्रातूनच घेणे आवश्यक आहे. ती निशुल्क आहेत म्हणून प्रभावहीन असतील असे अजिबात समजू नका, कारण सर्वप्रथम त्यांची गुणवत्ता अत्यंत काटेकोरपणे तपासल्या जाते.

अधिक माहिती पुढील भागात!

# सहार पीअँडटी कॉलनीत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा




**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई** – सहार पीअँडटी कॉलनीच्या विकासासाठी कायमच धडपड करणारे युवा कार्यकर्ते अभिजीत अवसरमोल यांचे योगदान मोठे आहे. आज त्यांनी कॉलनीसाठी महत्वपूर्ण असलेली सिक्युरिटी केबिन जे. कुमार कंपनी यांच्या सहकार्याने उभी केली आहे.त्यांसाठी कॉलनीची असोसिएशन देखील सहकार्य करत आहे. उत्तम जे असतं, त्यांना नाविन्याचा ध्यास असतो...त्यामूळे आजचा हा क्षण अनमोल आनंद देणारा आहे. अशीच कामे होत राहोत असे प्रतिपादन एअरमेल सॉर्टिंग डिव्हिजनचे वरिष्ठ डाक प्रवर अधिक्षक पांडुरंग चोरमले यांनी केले.


अंधेरीच्या सहार रोडवर असणाऱ्या सहार पीअँडटी कॉलनीत पोस्ट ऑफिसच्या प्रांगणात स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी एअरमेल सॉर्टिंग डिव्हिजनचे वरिष्ठ डाक प्रवर अधिक्षक पांडुरंग चोरमले बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात लहान मुलांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीतानी झाली. एअरमेल सॉर्टिंग डिव्हिजनचे वरिष्ठ डाक प्रवर अधिक्षक पांडुरंग चोरमले यांच्या हस्ते सहार पीअँडटी कॉलनीच्या मुख्य स्टेजसमोरील प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी जे. कुमारचे प्रोजेक्ट मॅनेजर रमेश रेड्डी कट्टा, सहार पीअँडटी वेल्फेअर असोसिएशनचे सचिव आनंद निमंग्रे तसेच असोसिएशनचे मान्यवर, पदाधिकारी व कॉलनीतील रहिवासी व लहान मुले तसेच शाळेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने सहार पीअँडटी कॉलनीच्या सिक्युरिटी केबिनचे उद्घाटन पोस्टल अधिकारी वरीष्ठ डाक प्रवर अधीक्षक पांडुरंग चोरमले साहेबांच्या हस्ते झाले. सर्वांची साथ असेल तर जगात काहीही अशक्य नाही. कॉलनीचे परिवर्तन सुरू आहे असे सुतोवाच असोसिएशनचे सचिव आनंद निमंग्रे यांनी दिले. कॉलनीला उत्तम बनवण्यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे अभिजीत अवसारमोल यांनी सांगितले व सर्वांचे आभार मानले. कॉलनीसाठी अतोनात मेहनत घेणाऱ्या अभिजित अवसरमोल व त्याच्या टीमचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले. कार्यक्रमात लहान मुलांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गाण्यांना लक्षणीय दाद मिळाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशिष निनगुरकर तर आभार सुमंत काळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी असोसिएशनचे ज्ञानेश्वर जाधव, रत्नाकर केंद्रे, शिवराज कुंभार, विशाल एस पांडे, निलेश चोपडे आदी सहकारी मित्रांनी विशेष परिश्रम घेतले.


## कवितेच्या लाटावर...





## कवितेच्या लाटावर...






## कवितेच्या लाटावर...






## कवितेच्या लाटावर...




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559